**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

शुध्द व थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक.

शुध्द व थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा करणेकामी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्याची माहिती, www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर व संत तुकाराम भवन येथे उपलब्ध आहे.

स्वा/—
कार्यकारी अधिकारी
(संपर्क क्र. ०२१८६ २२४४६६)

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक

१. सदर कामाची माहिती, अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे व www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळेल.

२. दरपत्रक छापील स्वरूपात स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा कामासाठी भरलेले आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा.

३. सिलबंद दरपत्रक कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नावे दि.०९/०९/२०१९ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत पोहोचेल अशा रितीने पाठवावे. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावे किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

४. दरपत्रकासोबत आधारकार्ड, पॅनकार्ड, व्यवसाय परवाना, नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्रे इ. कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रक स्विकारले जाणार नाही. तसेच संबंधित प्राधिकारी यांचे नजीकचे कालावधीत पाणी नमुना तपासणीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५. दरपत्रकात नमुद पाण्याचा दर सर्व करासहीत नमुद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

६. दरपत्रक ज्याचे नावे मंजुर होईल, त्यांनी अनामत रक्कम रू.५,०००/— रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे.

७. पुरवठादाराने दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या दराने दि.०१/११/२०१९ ते दि.३१/१०/२०२० या कालावधीत इकडील मागणीप्रमाणे शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा करणे आवश्यक आहे.

८. पुरवठा करावयाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| तपशिल |
|---|
| शुध्द थंड पाण्याने भरलेला जार (१८ लिटर) |

९. नमुद केलेल्या परिमाणा पेक्षा २५ टक्के जादा मालाची मागणी समितीकडून झाल्यास जादा मालाचा पुरवठा मान्य दरानेच करण्याचे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

१०. मंजूर झालेल्या दराने व मागणी प्रमाणे माल पुरवठा करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाव वाढ दिली जाणार नाही व मागता येणार नाही. निविदाधारकाने माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास त्याची पुरवठा न केलेल्या मालाची सुरक्षा अनामत रक्कम समिती खाती जमा करणेत येईल. त्याबाबत समिती व्यवस्थापन निर्णय घेईल.

११. थंड पाण्याने भरलेल्या जारची गुणवत्ता चांगली असणे आवश्यक आहे.

१२. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किंमतीच्या ५% पर्यंत दंड आकारण्यात येईल.

१३. पुरविण्यात येणारे पाणी खराब असल्याचे आढळून आलेस, त्याबाबतची तपासणी करून खात्री केल्यानंतर पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

१४. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१५. सदर कामासाठी कोणतीही ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१६. जार पुरवठा करणेचे ठिकाण श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर, श्री. संत तुकाराम भवन, श्री. संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप, वेदांता भक्तनिवास, व्हिडीओकॉन भक्तनिवास, एमटीडीसी भक्तनिवास, पंढरपूर शहर व परिसरातील परिवार देवतां मंदिरे, पदस्पर्शदर्शनरांगेत एकविरा देवी मंदिर ते पत्राशेड ते गोपाळपूर रोड येथे करणे आवश्यक आहे.

१७. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.

१८. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहतील.

१९. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर झालेली आहे त्यांनी रक्कम रू.१००/– चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

२०. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रक कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

२१. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२२. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

———————''————————